IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
REVIEW OF RESEARCH
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 8 | MAY - 2018

# भारतातील बौध्द तत्वज्ञान आणि परंपरा



प्रा.डॉ.व्ही.एस.देसले[1], प्रा.व्ही.के.देसले[2]
[1]न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील , कला महाविद्यालय, मारवड, ता. अमळनेर.
[2]श्रीमती वि.यु.पाटील , कला विज्ञान महाविद्यालय, साक्री.


## प्रस्तावणा

पृथ्वी तलावर मानवाची उत्पत्ती निर्माण झाल्यापासून अनेक स्थित्यंतरातून मानवाचा इतिहास बदलत गेला, त्यात मानवाने आपल्या बुध्दीच्या जोरावर व निसर्गाच्या नैतिक मुल्यांचा आदर व संगोपनाला महत्व देवून आपले जीवन व्यतीत केले. जसा बदलत गेला काळ तसे देवदेवता बदलत गेल्या त्याच प्रमाणे वृक्षदेवताही बदलत गेल्या. वृक्षाचे व पशुदेवतांचे महत्व वाढत गेले. आज सुध्दा आपल्याला इतिहासाकडे वळून बघण्याची आवश्यकता वाटत आहे. निसर्गाचा समतोल ठेवणे हा नेहमीच माणसापुढे यक्ष प्रश्न राहिलेला आहे. आज आपल्याला विज्ञान निसर्गाचे बदल व होणारे परिणाम यांची, माहिती देत असते. मात्र प्राचिन काळापासून अनेक वैज्ञानी भारतात झाले ज्यांनी वृक्षांचे व प्राण्यांचे महत्व आपल्याला सांगितले त्यात गौतम बुध्द व वर्धमान महाविर हे मणुष्याला जगण्याचा नवा मार्ग सांगुन गेले आहेत.

## स्थित्यंतर इतिहासाची गरज

प्राचीन भारताच्या इतिहासावर आपण जर नजर टाकली तर आपल्याला, सिंधु संस्कृती, ऋग्वेद काळ, उत्तर वैदिक काळा यांच्यात मोठया प्रमाणात स्थित्यंतरे झालेली दिसतात. ऋग्वेद काळात समाज हा समान होता त्या चातुर्वर्निय पध्दत अस्तीत्वाल नव्हती आणि जरी थोडया प्रमाणावर निर्माण झाली ती सौम्य स्वरुपाची होती. म्णजे पठण करणा-या ब्राम्हणाला जर पठण येत नसेस तर तो खालच्या वर्गात मोडला जात असे आणि खालच्या वर्गाच्या व्यक्ती किंवा स्त्री पठण करण्यास योग्य असले तर तीला किंवा त्याला वरचा वर्णात संबोधले जात होते. म्हणजे ऋग्वेद काळातील वर्णव्यवस्था ही बदलल्या स्वरुपाची होती. थोडक्यात विश्वामित्र क्षत्रिय असुन ब्राम्हणाचे कार्य करीत होते. तर पांडवांचे व कौरवांचे गुरु द्रोणाचार्य ब्राम्हण असुन क्षत्रियतेचे कार्य करीत होते. थोडक्या ऋग्वेद कालीन समाज जीवन सर्व समावेशक होते.

मात्र उत्तर वैदिक काळात वर्णव्यवस्था ताठर स्वरुपाची झाली. श्रेष्ठ व कनिष्ठ भाव निर्माण झाला. ज्ञानी ब्राम्हण होवू लागले असे नाही. तर ब्राम्हणाचा मुलगा अपात्र असतांनाही ब्राम्हणच गणला जाऊ लागला. व शुद्राचा मुलगा ज्ञानी असुनही शुद्र गणला जावू लागला



थोडक्यात प्रतिभावंत व कार्यक्षम शुद्र वर्गातील व्यक्तींना ब्राम्हण होणे अवघड झाले म्हणून शिक्षणापासुन वंचित झाले तर कालांतराणे क्षत्रिय होणे अवघड झाले म्हणून राज्यसत्ता त्यांच्यापासुन लांब गेली, तर वैश्यांपासुन लांब गेल्यामुळे अर्थसत्ता लांब गेली

या वरील स्थित्यंतरांमुळे समाजात नवा प्रवाह निर्माण झाला. काळाच्या बदलल्या स्वरुपाला आळा घालण्यासाठी राजा सिध्दार्थ सारखे व राजा वर्धमान सारखे समाजाला मार्गदर्श करण्यासाठी पुढे सरसावले.

सिध्दार्थाच्या मनात चार गोष्टी अहोरात्र घोळु लागल्या होत्या.

1. या भवनक्रात सापडलेल्या लोंकोची त्यातुन सुटका कशी होईल ?
2. अविद्येच्या अंधकारात चाचपडणा-या लोंकांना प्रज्ञाचक्षूची प्राप्ती कशी होईल?
3. अहकांराने आवृत्त झालेल्या लोकांना खरा मार्ग कसा दिसू लोगेल ?
4. 'पुरपि जननं पुनरपि मरणं' अशा त-हेच्या भवचक्राच्या फेरीतून कायमची मुक्ती देणारा असा प्रज्ञातृप्ती करणारा धर्म कसा कळेल ?

या चातुवर्णीय पध्दतीचा नाश करण्यासाठी जगाला नव्या धर्माचा मार्ग दाखविला. बिंबीसारने सिध्दार्थ यांना, राज्य सत्ता सांभाळण्याचा आग्रह करीत असतांना धर्म, सत्ता आणि धन या तिन्ही गोष्टींचा विचारपूर्वक आणि योग्य रीतीने उपयोग करुन दाखवील तोच खरा थोर युगपुरुष होय. असा उपदेश केला. त्यावर सिध्दार्थ म्हणाले,राजा, तू उदार थोर मनाचा शहाणा आहे. यात शंका नाही. अल्प तृष्णा वाईट नाही खरीः पण तृष्णा ही मर्यादेत राहणारी नाही. सत्ता म्हटली म्हणजे तिच्या बरोबर काळजी आलीच. पृथ्वीवरील राज्यधिकारृ स्वर्गवास, फार काय पण त्रिभुवनावरील स्वामित्व या सर्वांपेक्षा पवित्र आचरणाचे माहात्म्य अधिक आहे. संपत्तीची चंचलता आणि मोहजाल मी ओळखले आहे. आता अन्न म्हणून विषाचे सेवन मी उघडया डोळयांनी कसे करावे? पाण्यातल्या माशाने आमिषाला, किंवा स्वतंत्रपणाने आणि स्वच्छंदाने उडणा-या जबडयात जाऊन पडावे काय? माझ्यासाठी विनाकारण हळहळू नका.राज्यवैभव संपत्ती यांची प्राप्ती बरोबर ज्यांच्या अंगावर अहोरात्र चिंतेचा भार येऊन पडला आहे, अशांसाठी हळहळा. माझे मन या ऐहिक गोष्टींना विटले आहे. त्यात त्याला आता मुळीच मौज वाटत नाही. यामुळे मी स्वतः राजभूषण्यांचा त्याग केला. मी आता ज्ञात्यांना शरण जाऊन धर्मसाधना करण्याचा निश्चय केला आहे. दुःखापासून मुक्ती मिळविण्याचा मार्ग शोधणे हा माझा आता जिवनाचा उद्देश आहे. हे सांगुण सिध्दार्थ वणात तपश्चर्या करण्यासाठी निघुन गेला. घोर तपश्यर्चमुळे शरीर शुष्क होऊन सिध्दार्थ मूर्च्छित होऊन पडला असता, जवळच्या गवातल्या एका गवळयाची नंदा नावाची मुलगी वनदेवतांना नैवेदय दाखविण्यासाठी दुधाची खीर घेऊन आली. आंबाराईखाली सिध्दार्थ पडलेला पाहुन वनदेवतेने आज प्रत्यक्ष आपणांस दर्शन दिले असे तिला वाटले, आणि तिने वंदन केले आणलेल्या खिरीचे जेवण करण्याची सिध्दार्थला तिने विनंती केली. सिध्दार्थला काही खायला पाहिजे होते, ते आयते पुढे आलेले पाहून त्याला फार संतोष झाला व त्याने सगळी खीर पिऊन टाकली. तेव्हा पासुन सिध्दार्थला हे कळून चुकले की, मोक्ष प्राप्तीसाठी अन्नत्याग करणे अवश्यक नाही. तेव्हा पासुन सिध्दार्थ अन्नग्रहण करु लागला.

'मला संप्रदाय, नाही जाती, वर्ण, वगैरे भेद न ठेवता अखिल मानव जातीच्या दुःखांचा नाश करण्याचा मार्ग मी शोधुन काढला आहे.' बौधत्व साध्य झाल्यानंतर ते समाजाला सांगण्यासाठी गौतम बौध्द वेगवेगळया प्रांतात हिंडून भिक्षा मागुन व त्याच ठिकाणी आपली प्रवचने देवून समाजाला मोक्ष प्राप्तीचा मार्ग सांगु लागले, त्यात सत्य, अहिंसा,अस्तेय, अपरीग्रह, आणि ब्राम्हचर्य याचे पालन करण्याचे सांगु लागले. त्याच बरोबर राज्या-राज्यामधील तंटे सोडवू लागले. तसेच या मध्यम मार्गा खेरीज निर्वाणप्राप्तीचा दुसरा उपाय नाही हा मध्यम मार्ग म्हणजे सम्यक दृष्टी,सम्यक संकल्प, सम्यक वाक्, सम्यक कर्मान्त, सम्यक आजीव, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती व सम्यक समाधी यांनी मुक्त असा आर्य अष्टांगिक मार्ग हा होय. असा जीवनाचा खरा अर्थ् समाजाला सांगु लागले. वृक्षांचे महत्व, पशुंचे महत्व ते सर्वत्र सांगु लागले. थोडक्यात महात्मा गांधीजीनी राबविलेल्या ग्रामस्वराज्य या आजच्या सुधारकांप्रमाणे बौध्दांनी समाजासाठी जीवनमार्ग पुर्वीच सांगुन टाकला.

वरील हया बौध्द विचारांचा प्रभाव भारतीय जीवनावर आजही प्रतीत झालेला दिसतो. तो महान विचार भारतीय विचारवंतांनी, समाजसुधारकांनी उचललेला दिसतो.

*" His Humidity is toching and recalls to one's mind the huminity of the Buddha and Jesus."*

*"sush a nightmarish world, as ours, can be made a tolerable abode of living if man, according to Gandhi, remembers God an follows Satya, ahinsa and brahmacharya the tragedy of modern man is that he scorns spiritual values and worships Mommon."*

## निष्कर्षः-

महात्मा गौतम बुध्दांनी सांगीतलेला धर्माचा अवलंब फक्त बोध्द धर्माबाबत नसुन मनुष्याने जगत असतांना त्यांनी सांगीतलेल्या सदाचाराचे अवलोकन करणे होय. हीच शिकवण भारतीयांना नवा मार्ग दाखविणारी आहे. बौध्दांच्या विचारांनी संपुर्ण भारत भारावला होता. त्यांनी पशु हत्या करु नका, पर्यावरणाचे रक्षण करा, वृक्षांचे रक्षण हे मानव जातीचे रक्षण आहे. हे ते त्यांच्या प्रवचनातुन सांगुन गेले, त्यांच्या या प्रवचनांचे चित्र प्रतिकात्मक रुपात सांची स्तुपावर रेखाटलेले आहे. त्यांचे हे तत्वज्ञानाचे अनुकरण आजतागायत होत आलेले आहे. महात्वा गांधी, विनोबा भावे, व डॉ. भिमराव आंबेडकर आदिंनी त्यांचे पालन केले आहे. आणि भविष्यात आदर्श जीवनासाठी गौतम बुध्दांचे विचार मणुष्याला मणुष्याप्रमाणे जगण्यास पुरक ठरतील.

## संदर्भ सूची :-


१) कोसंबी , डी. डी., प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता .
२) आपटे वासुदेव गो. बौध्द पर्व.
३) मार्डीकर मदन., प्राचीन भारताचा इतिहास
४) शहा जी. बी., प्राचीन भारताचा राजकीय आणि सांस्कृतीक इतिहास.
5) *Dr. Pruthi R. K., and Dr. Chaturvedi Archana., Social Philosophy of Mahatma Gandhi. P- 8 , 287.*